स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**

**बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. :तंशिविकापु/शै.वि-५/नियोजन/NSS/Story Book/२०२४-२५/ 1906

दिनांक : 03 MAY 2024

## परिपत्रक

प्रति,

प्राचार्य,

सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित

राष्ट्रीय सेवा योजना राबविणा-या संस्था,

पुणे विभाग

**विषय :** राष्ट्रीय सेवा योजनांतर्गत स्वयंसेवकांची यशोगाथा पाठविण्याबाबत

**(A success Story Book of NSS Volunteers )**

**संदर्भ :** १. राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी,रासयो, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.रासयो-२०२३/प्र.क्र.८०/रोसेयो कक्ष,दि.२९ एप्रिल २०२४

२. तंत्रशिक्षण संचलनालय,मुंबई यांचे कालमर्यादित पत्र क्र.९/नियोजन/ NSS/Story Book/२०२४/१९५, दिनांक ०३ /०४/२०२४

उपरोक्त विषयांस अनुसरून संदर्भीय पत्रामध्ये प्राप्त निर्देशा नुसार कळविण्यांत येते की , राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांमध्ये ,सामाजिक,सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय मुल्ये संस्कारित करणारी सुपीक जमीन आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक ही विधायक शक्ती आहे. देशाच्या समृध्दीचे वाहक म्हणुन युवकांची कामगिरी फार महत्वाची असते. राष्ट्रीय सेवा योजनेत या युवकांची मूल्यात्मक व कार्यानुभवाच्या पातळीवर सशक्त पायाभरणी केली जाते, रासेयो स्वयंसेवकांनी घेतलेले कार्य नैतिकदृष्ट्या व मूल्यात्मकदृष्ट्या विशेष महत्वाचे आहे. या अनुषंगाने त्यांच्या मार्फत होत असलेल्या कार्यास प्रातिनिधिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजनेत कार्यरत स्वयंसेवकांना अनेक अविस्मरणीय प्रसंगांना सामोरे जावे लागते त्या प्रसंगातूनच यशोगाथा तयार होत असते. अशा लेखी स्वरूपातील यशोगाथा तसेच छायाचित्रे पाठविण्याबाबत राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी,रासयो, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

तरी आपल्या संस्थेतील यशस्वी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची लेखी स्वरूपात यशोगाथा तसेच छायाचित्रे दि. ५ मे , २०२४ पर्यन्त राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी,रासयो, महाराष्ट्र शासन यांना nssmantralaya@gmail.com या ईमेल वर पाठविण्यांत यावे. व त्याची एक प्रत या विभागीय कार्यालयास ईमेल द्वारे सादर करावी.( ropune@dtemaharashtra.gov.in ) स्वयंसेवकांची यशोगाथा कहाणी साधारणत: १००० शब्दांची असणे अपेक्षित आहे.

(डॉ.द.व्यं.जाधव)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.